# २१. कोऽ कोऽ कोंबडा !

- ऐका. म्हणा.


कोऽ कोऽ कोंबडा,
पांढरा नि तांबडा.
छपरावर जाऊन,
पाय झाला लंगडा.
कोऽ कोऽ कोंबडा !





चिव चिव चिमणी,
खाते दाणे, पिते पाणी.
कंठात मणी, चोचीत गाणी,
घरट्यात झुलते चिऊताई राणी.
चिव चिव चिमणी !

काव काव कावळा,
काळा नि सावळा.
म्हणतो मी भोळा,
पण खाऊवर डोळा.
काव काव कावळा !





मिठू मिठू पोपट,
करतो वटवट.
पानात लपतो,
कैरी खातो.
मिठू मिठू बोलतो !

– रमेश चिल्ले